# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र. १६४** **दिनांक १८/०६/२०२१**

## ट्रेलर मधुन लोखंडी सळईचा अपहार करणारी ९ आरोपींची टोळी जेरबंद करण्यास वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश.

दिनांक १६.६.२०२१ रोजी श्री. विलास चौगुले व.पो.नि. वालीव पोलीस ठाणे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ‘इसम नामे प्रशांत सिंग हा वाडा, पालघर येथुन लोखंडी सळईने भरुन आलेल्या ट्रक/ट्रेलर पैकी काहि माल ट्रक चालक यांना हाताशी धरुन ट्रक/ट्रेलर मधील काहि प्रमाणात लोखंडी सळई वसई पु. येथील खैरपाडा भागात पाण्याचे टाकीजवळ, रोड नजीक टाकुन चोरी करीत असलेबाबत बातमी मिळाली’ त्यावरुन वपोनि. विलास चौगुले यांनी वालीव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटिकरण शाखेस कारवाई करण्याचे आदेश दिले.

माहितीचे अनुषंगाने वालीव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी दि १६/०६/२०२१ रोजी सदर ठिकाणी सापळा रचुन कारवाई केली असता, कारवाई मधे एकुण लोखंडी सळईने भरलेले सहा ट्रेलर, एक आयसर टेम्पो व एक वेगनर कार असे एकुण २ करोड १३ लाख ३५ हजार ७९७/- रुपये किंमतीचा एकुण मुद्देमाल तसेच एकुण ०९ आरोपीत १) प्रशांत रमाशंकर सिंग वय : ३५ वर्षे वालीव, वसई पुर्व, २) उमेश छत्रपाल सिंग वय-४२ वर्षे रा. डोंबिवली पुर्व ३) सोनु उर्फ सर्वेश पुथ्वीपाल सिंग वय : ३१ वर्षे रा. वाडा ता.वाडा ४) रामु विरेंद्रकुमार गौतम वय-२२ वर्षे रा. वाडा ता. वाडा ५) संदिप बाबुलाल गौंडा वय २५ वर्षे रा. दिवा पुर्व खर्डीगाव ६) मोहीदुर रहेमान बाबरअली वय ३९ वर्षे रा. ठि. वाडा, ७) रमेश लालधारी राजभर वय ३५ वर्षे रा. संतोषभवन, लसारीमंदिर ८) पंकज रामा सिंग वय ३० वर्षे धंदा-ड्रायव्हर रा.ठि. मानपाडा रोड, डोबिंवली पुर्व ९) कमलेश श्रीराम वर्मा रा. ठि. विक्रोळी मुंबई यांना रंगेहात पकडले.

सर्व ९ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असुन सळई चोरीबाबत आरोपींविरुद्ध श्री. जी कॉर्पोरेशन चे मालक किरीट कामदार यांनी लोखंडी सळई चोरी झाले बाबत फिर्याद दिले वरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर I ५६३/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ४०७, ५११, ३४ अन्वये दि. १६.६.२०२१ रोजी दाखल करण्यात आला असुन गुन्हयात चोरीस गेलेल्या १ लाख ३३ हजार २७७ रुपये किंमतीच्या लोखंडी सळई (मुद्देमाल) हस्तगत करण्यात आल्या आहेत. तसेच सदर गुन्हयाचा पुढील तपास ज्ञानेश फडतरे नेम- वालीव पोलीस ठाणे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परि-२, श्री. अमोल मांडवे सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरीष्ठ पोलीस निरीक्षक वालीव पोलीस ठाणे, पोनि श्री.राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, योगेश देशमुख, पो.ना. किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, अनिल सोनवणे, सतिष गांगुर्डे, पोशि विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, सचिन बलीद, गजानन गरीबे, यांनी केलेली आहे.

-------oooooo-------